2020-21

# डॉ. एस. आर. रंगनाथन:

## एक वैश्विक ग्रंथपाल



-संपादक-

डॉ. राहुल कल्याणराव देशमुख

डॉ. विलास अशोकराव काळे



IQAC-COORDINATOR
Kal.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kal. Rasika Mahavidyalaya Deoni Tq. Deoni Dist. Latur

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

12 August - 2020

# डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान

प्रा. डॉ. शिवाजी नारायणराव सोनटक्के
ग्रंथपाल तथा उपप्राचार्य,
कै. रसिका महाविद्यालय, देवणी, जि. लातूर

डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे पूर्ण नाव डॉ. शियाली रामामृत रंगनाथन असे होते. त्यांचा जन्म तमिळनाडूतील शियाली या छोट्याशा खेडेगावात ९ ऑगस्ट १८९२ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना गणित विषयाची व वाचनाची आवड होती. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर सुरवातीच्या काळात त्यांनी मद्रास येथे फिजिक्स व मॅथेमॅटिक्स या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर मद्रास विद्यापीठात ग्रंथपाल म्हणून त्यांची निवड झाली; परंतु या क्षेत्राचे प्रशिक्षण त्यांच्याकडे नसल्याने ते घेण्यासाठी इंग्लंडला गेले. एक वर्षात प्रशिक्षण पूर्ण करून १९२५ मध्ये भारतात परत आले. प्रशिक्षण काळात इंग्लंडमध्ये ग्रंथालयांचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला होता, तसेच तेथे समाजातील सर्व स्तरांतील घटकांना समान व चांगल्या दर्जाची ग्रंथालय सेवा दिली जात होती. अशा प्रकारची ग्रंथालयासंबंधीची परिस्थिती त्या वेळी भारतात नव्हती. इंग्लंडमध्ये दिल्या जाणाऱ्या ग्रंथालय सेवा-सुविधा, तसेच त्यासाठी वापरली जाणारी तंत्रे, ग्रंथालयाचा परिसर व साधनसामग्री या सर्वांचा परिणाम डॉ. रंगनाथन यांच्या मनावर झाला.

भारतात मात्र ग्रंथालयांची दयनीय अवस्था होती. सर्वच ग्रंथालयांतील तत्त्वे ही वगेवेगळी होती. त्यामुळे सर्वच ग्रंथालयांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे वापरली तर ती उपयोगी ठरतील, असे त्यांना वाटू लागले. म्हणून त्यांनी काही सिद्धांत, संकल्पना मांडण्याचा प्रयत्न त्या वेळी केला. डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथालयांबाबत काही मूलभूत संकल्पना पंचसूत्रीच्या माध्यमातून मांडल्या. ग्रंथालयशास्त्राचे पाच सिद्धांत सर्वप्रथम डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी जगासमोर मांडले. म्हणूनच त्यांना ग्रंथालयशास्त्राचे जनक मानले जाते. ग्रंथालय चळवळ वृद्धिंगत होण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

अनेक बाबींचा सखोल अभ्यास करून ग्रंथालयशास्त्रातील मूलतत्त्वांच्या



IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur
Kai. Rasika Mahavidyalaya Deoni Tq. Deoni Dist. Latur

विकासासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. ग्रंथालयामध्ये केवळ ग्रंथसंग्रह अथवा कर्मचारीवर्ग असून भागत नाही, तर ग्रंथांचा वापर करणारा वाचकवर्गदेखील असणे आवश्यक असते. वाचक आणि ग्रंथालय यातील कर्मचारी उत्साही असतील तरच त्या ग्रंथालयाला अधिक प्रमाणात महत्त्व प्राप्त होत असते.

ग्रंथालयशास्त्रावर आधारित अनेक पुस्तके डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी लिहिली आहेत. ग्रंथालय चळवळ वाढीसाठी सर्वप्रथम पुढाकार त्यांनी घेतला होता. सर्व ग्रंथालयांतील ग्रंथपाल व कर्मचारीवर्गास अधिकार मिळण्यासाठी त्यांनी त्या काळात अनेक प्रयत्न केलेले आहेत. त्याचसोबत ग्रंथालय कर्मचाऱ्यांना कर्तव्याची जाणीवदेखील त्यांनी करून दिलेली आहे.

**पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे संपादनकार्य आणि ग्रंथसंपदा**

**संकीर्ण :**

१) पहिल्या आशिया शैक्षणिक परिषदेत ग्रंथालय सेवा विभागासाठी पेपर सादर : १९३०
२) ग्रंथालयशास्त्राची पंचसूत्री : १९३१, १९५७
३) फावल्या वेळेसाठी/वेळेतील शिक्षण : १९४६, १९४९
४) ग्रंथ अध्ययनार्थ है । : १९४८ (हिंदी)
५) ग्रंथालयशास्त्र प्रस्तावना : १९४८
६) ग्रामीण प्रौढशिक्षण : १९४९
७) ग्रंथालय दौरा : १९४८, युरोप आणि अमेरिका : प्रभाव आणि प्रतिबिंब : १९५०
८) ग्रंथालय नियमपुस्तिका : १९५०, १९६०
९) ग्रंथालय प्रक्रिया : १९५० (हिंदी)
१०) पुस्तकालय विज्ञान की भूमिका : १९६४
११) ग्रंथालय कैपिदी : १९६८ (तमीळ)

**संघटन :**

१२) आदर्श ग्रंथालय कायदा : १९३१
१३) आदर्श सार्वजनिक ग्रंथालय विधेयक : १९४१
१४) भारतीय ग्रंथालयांची दुसऱ्या महायुद्धानंतर पुनर्रचना : १९४४
१५) राष्ट्रीय ग्रंथालय व्यवस्था : भारतासाठी एक योजना : १९४६
१६) मुंबईसाठी ग्रंथालय विकास योजना, ग्रंथालय विधेयकासह : १९४७
१७) प्रांतिक संघासाठी ग्रंथालय विकास योजना, ग्रंथालय विधेयकासह : १९४९

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

१८) भारतासाठी आगामी ३० वर्षीय गंथालय विकास योजना : १९५०
१९) मद्रास ग्रंथालय कायद्यासाठी ग्रंथालय अधिनियम हस्तध्याय ग्रंथ : १९५३
२०) ग्रंथालय व्यक्ती आणि ग्रंथालय विधेयक, पश्चिम बंगाल : १९५८
२१) केरळसाठी ग्रंथालय विकास योजना, ग्रंथालय विधेयक मसुद्यासह : १९५९
२२) ग्रंथालय आठवडा स्मरणिका : १९६३
२३) महाराष्ट्रासाठी सार्वजनिक ग्रंथालये विधेयकाचा मसुदा : १९६५
२४) सर्वांना ग्रंथालय सेवा : १९६६
२५) सर्वांसाठी मोफत ग्रंथसेवा : १९६८
२६) सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्था : भारत, नेपाळ, श्रीलंका, इंग्लंड, अमेरिका : १९७२
२७) भारतीय सार्वजनिक ग्रंथालय व्यवस्थेचे राष्ट्रीय जाळे : १९७२

**प्रशासन :**

२८) ग्रंथालय प्रशासन : १९३५, १९५९

**वर्गीकरण :**

२९) द्विबिंदू वर्गीकरण : १९३३, १९३९, १९५०, १९५२, १९५७, १९६०
३०) ग्रंथालय वर्गीकरणास प्रस्तावना : १९३७, १९५७, १९६७
३१) ग्रंथालय वर्गीकरण : मूलतत्त्वे आणि कार्यपद्धती : १९४४
३२) ग्रंथालय वर्गीकरणाचे घटक : १९४५
३३) मराठी साहित्याचे वर्गीकरण : १९४५
३४) तेलगू साहित्याचे वर्गीकरण : १९४५
३५) वर्गीकरण आणि आंतरराष्ट्रीय प्रलेखन : १९४८
३६) वर्गीकरण, संकेतन आणि तांत्रिक शोध : १९५०
३७) ग्रंथालय वर्गीकरणाचे तत्त्वज्ञान : १९५१
३८) वर्गीकरण आणि संप्रेषण : १९५१
३९) सखोल वर्गीकरण : १९५३
४०) द्विबिंदू वर्गीकरणाचा वर्णनात्मक लेखा : १९६७

**तालिकीकरण :**

४१) वर्गीकृत तालिका संहिता : १९३४, १९४५, १९५१, १९५८, १९६४
४२) ग्रंथालय तालिकेचे तात्त्विक : १९३८
४३) शब्दकोश तालिका संहिता : १९३८
४४) ग्रंथालय तालिका : मूलतत्त्वे आणि कार्यपद्धती : १९५०
४५) अनुवर्ग सूची कल्प : १९५२ (हिंदी)

**संदर्भसेवा :**

४६) संदर्भसेवा आणि ग्रंथसूची : १९४०
४७) संदर्भसेवा : १९६२

**ग्रंथसूची :**

४८) संदर्भग्रंथ आणि ग्रंथसूची : १९४१
४९) सार्वजनिक ग्रंथालय तरतूद आणि प्रलेखन अडचणी : १९५१
५०) सामाजिक ग्रंथसूची : १९५२
५१) कोमोरेशन ग्रंथसूची : १९६१

**ग्रंथ निवड :**

५२) ग्रंथालय ग्रंथ निवड : १९५२, १९६६

**शैक्षणिक ग्रंथालये :**

५३) दक्षिण आशियातील नियतकालिकांची संघसूची : १९५३
५४) शालेय आणि महाविद्यालय ग्रंथालये : १९४२
५५) अलाहाबाद विद्यापीठासाठी ग्रंथालय विकास योजना : १९४७
५६) भारतीय ग्रंथालयांचे संघटन : १९४६
५७) नवशिक्षण आणि शालेय ग्रंथालय : १९७३

**प्रौढशिक्षण :**

५८) फावल्या वेळासाठी शिक्षण : १९४६, १९४८, १९५४
५९) ग्रामीण प्रौढशिक्षण : १९४९
६०) सामाजिक शिक्षण साहित्य : १९५२
६१) नवसाक्षरांसाठी विद्यापीठ शिक्षण साहित्य : १९५३
६२) भारतातील विद्यापीठ सुधारणा : १९५२

**निर्देशिका :**

६३) भारतीय ग्रंथालय निर्देशिका : १९५१

**प्रलेखन :**

६४) प्रलेखन आणि त्यांचे पैलू : १९६३
६५) प्रलेखन : उगम आणि विकास : १९७२

**प्रमुख प्रकाशन संस्था/साधने :**

१) मद्रास ग्रंथालय संघ, मद्रास
२) आशिया पब्लिशिंग हाउस, बलार्ड इस्टेट, कालिकत स्ट्रीट, मुंबई


IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni Tq. Dist. Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

३) विकास पब्लिशिंग हाउस, ५, दर्यागंज, अन्सारी रोड, दिल्ली

**प्रमुख प्रकाशन माला :**

१) मद्रास ग्रंथालय संघ प्रकाशन माला (१९३१–५३)

२) ग्रंथालयशास्त्रातील रंगनाथन माला (१९४८–७१)

३) ग्रंथालयशास्त्रातील शारदा रंगनाथन माला (१९७२–७३)

**रंगनाथन यांच्याविषयी लेखन :**

१) रंगनाथन गौरव ग्रंथ, खंड १ : ग्रंथालयशास्त्र आज, पी. एन. कौल, संपा. : १९६५, पृ. ८३२

२) रंगनाथन गौरव ग्रंथ, खंड २ : व्यक्तिगत ग्रंथसूची निबंध : रंगनाथन यांची ग्रंथसंपदा व त्यांच्याविषयी लिखाण, ए. के. दासगुप्ता : १९६७, ४०५ पृ.

३) रंगनाथन काय म्हणतात? : पी. एन. कौल, संपाद. : १९६५

४) एस. आर. रंगनाथन १९९२–१९७२, एडवर्ड ड्युडले, संपा. : १९७१

५) रंगनाथन : एक कित्ता निर्माता : ए. पी. श्रीवास्तव : १९७७

६) रंगनाथन : पद्धत आणि शैली : एम. पी. सतिजा : १९७८

७) रंगनाथन यांचे तत्त्वज्ञान : मूल्यमापन, प्रभावी आणि अन्वर्थकता/संगती, टी. एस. राजगोपालन, संपा. : १९८६

८) हेरॉल्ड ऑफ लायब्ररी सायन्स : रंगनाथन विशेषांक खंड १, नं. ४, ऑक्टोबर १९६२

९) हेरॉल्ड ऑफ लायब्ररी सायन्स : रंगनाथन स्मृती विशेषांक, खंड १२, नं. ३+४. जलै १९७३

१०) पाकिस्तान लायब्ररी रिव्ह्यू : रंगनाथन विशेषांक, खंड ४, सप्टें.-डिसें. १९६२

ग्रंथालयशास्त्रातील जुन्या संकल्पना मोडीत काढून नवीन संकल्पनेस डॉ. रंगनाथन यांनी चालना दिलेली आहे. ग्रंथालयातील मुक्तद्वार पद्धतीस त्यांनीच सर्वप्रथम प्रोत्साहन दिलेले आहे.

ग्रंथालयशास्त्रामध्ये ग्रंथ-वर्गीकरण व तालिकीकरणाच्या नवीन पद्धती त्यांनी शोधून काढल्या आहेत. ग्रंथ वर्गीकरणामध्ये त्यांनी दिलेली पद्धत शास्त्रशुद्ध असून, पूर्ण जगभर ती लोकप्रिय झालेली आहे. विशेष ग्रंथालयामध्ये या पद्धतीचा प्रामुख्याने वापर करण्यात येतो. ग्रंथालयातील प्रत्येक बाबीवर डॉ. रंगनाथन यांनी त्यांच्या लेखनीतून प्रकाश टाकलेला आहे. त्यामुळे डॉ. रंगनाथन यांना ग्रंथालयशास्त्राचे जनक म्हणून संबोधले जाते. अशा प्रकारे ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून संपूर्ण जगात नावलौकिक मिळविलेल्या थोर विभूतीचे नाव व ग्रंथालयशास्त्रातील त्यांची पंचसूत्री नेहमीच अजरामर राहील.



संदर्भग्रंथ सूची :


- अघाव, उद्धव (२००४), पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन : जीवन व कार्य, पवन प्रकाशन, परभणी.
- नरगुंदे, रेवती (२००२), ग्रंथालये आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
- पवार, एस. पी., बडकते सविता (२००२), ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- उजळंबकर, कृ. मु. (१९७४), पद्मश्री शि. रा. रंगनाथन : व्यक्ती व कार्य, पद्मश्री रंगनाथन समिती, पुणे.
- साखरे, राजेंद्र रमाकांत (२००३), ग्रंथालय संदर्भसेवा : तात्त्विक व प्रात्यक्षिक, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (१९९४), ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणक्रम पुस्तके, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.


◆ ◆ ◆ ◆ ◆

IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kai. Rasika Mahavidyalaya Deoni Tq. Deoni Dist. Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

## अनुक्रमणिका


- ग्रंथालयमहर्षी डॉ. रंगनाथन : जीवनकार्य ................. ११
  – डॉ. धर्मराज क. वीर
- ग्रंथालय क्षेत्रातील डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे कार्य ..... १९
  – प्रा. डॉ. मारोती बालासाहेब भोसले
- ग्रंथालयमहर्षी डॉ. शियाली रामामृतम् रंगनाथन् ........... २५
  – प्रा. चंद्रकांत राजारामपंत जोशी सनपूरकर
- पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन जीवन व कार्य ........... २९
  – डॉ. विलास अशोकराव काळे
  – प्रा. दत्ता अंकुशराव पवार
- गुगल स्कॉलरमध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या वाचनसाहित्याचा सहभाग ................................ ३६
  – डॉ. राहुल के. देशमुख
- ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक : डॉ. एस. आर. रंगनाथन ................................ ४१
  – डॉ. अभिजित बाबरे
- भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन ................................ ४४
  – डॉ. कल्याण कुंभार
- एका माणसाची ग्रंथालय चळवळ : डॉ. एस. आर. रंगनाथन ................................ ५०
  – डॉ. बी. आर. लोकलवार
- ग्रंथालय : मानवाला माहितीचे पाठबळ देणारे केंद्र ........ ५४
  – डॉ. प्रीतम भीमराव गेडाम
  – डॉ. प्रिन्स अजयकुमार टी. अगाशे
- भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक : पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन ........................... ६०
  – श्री. गोपाल राजाराम पाटील




3

■ डॉ. रंगनाथन यांच्या पंचसूत्रीचे उच्चशिक्षणात योगदान : एक विश्लेषण ........................................ ६४
– प्रा. सुरेश म. हुमणे

■ डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालयीन क्षेत्रातील योगदान ........................................ ६९
– प्रा. कल्पना आबाराव सिडाम

■ ग्रंथालय आणि पंचसूत्री नियम........................ ७३
– प्रा. राजाराम वामन कापडी

■ डॉ. एस. आर. रंगनाथन, 'भविष्यवेध घेणारा ग्रंथपाल' .... ८५
– संतोष कीर्तनकार

■ डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान ........................................ ९०
– किशोरी दिघोळकर
– सीमा प्रभाकरराव खोबे

■ पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथान यांचे सिद्धांत आणि आधुनिक ग्रंथालय ........................................ ९३
– प्रा. हितेश गोपाल ब्रिजवासी

■ डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालयीन क्षेत्रातील योगदान ........................................ ९९
– प्रा. डॉ. राजकुमार घुले

■ भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन : परिचय ........................................
– श्री. विजय छबूराव रहाणे

■ डॉ. शियाली रामामृत रंगनाथन: (१८९२–१९७२)......... १०६
– डॉ. संभाजी गुलाबराव पाटील

■ श्री शिवाजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या सूत्राचे उपयोजन ......... १११
– डॉ. रामदास टेकाळे

■ ग्रंथालय चळवळीचे जनक – डॉ. एस. आर. रंगनाथन.... ११६
– श्री. योगेश प्रकाश सुरवाडे

■ डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान. १२०
– प्रा. डॉ. शिवाजी नारायणराव सोनटक्के

■ पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन : एक सार्वत्रिक (वैश्विक) ग्रंथपाल ........................................ १२६
– प्रा. संभाजी पी. व्याळीज

■ भारतीय ग्रंथालयशास्राचे जनक : डॉ. एस. आर. रंगनाथन आणि त्यांची पंचसूत्री .................................... १२९
– डॉ. मदान डी. झाडे

■ डॉ. एस. आर. रंगनाथन – ग्रंथालय आणि पंचसूत्री नियम ........................................ १३२
– श्री. सागर रोहिदास लोंढे

■ भारतीय ग्रंथालयशास्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन .. १३५
– श्रीमती संगीता नाटकर

■ डॉ. एस.आर. रंगनाथन : संक्षिप्त जीवनचरित्र ............. १४१
– प्रा. अशोक एच. वैद्य
– अजित म. घुमरे



डॉ. [illegible] (एम. ए., एम. लिब आणि आय. सी., एम. फिल (मराठी, ग्रंथालय), बी. एड., पीजीडीएलएन, पीएच. डी. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र), ९ वर्षांपासून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यावसायिक अनुभव. २०१९ पासून परंडा येथील शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत. ८ ग्रंथ प्रकाशित, २ संपादकीय ग्रंथ, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषद व चर्चासत्रांत २९ शोधनिबंधांचे सादरीकरण, ३२ शोधनिबंध विविध जर्नलमध्ये प्रकाशित, ५ वर्तमानपत्रांत लेख, २८ कार्यशाळा/परिसंवादात सहभाग, २ राष्ट्रीय ग्रंथालय संघटनांचे आजीव सदस्य, ५ राष्ट्रीय ग्रंथालय संघटनांचे राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त.

•••



डॉ. विलास अशोकराव काळे (एम. ए., एम. लिब आणि आय. सी., पीएच. डी. (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र), ९ वर्षांपासून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यावसायिक अनुभव. २०१४ पासून पूर्णा येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत. २ ग्रंथ प्रकाशित, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषद व चर्चासत्रांत तसेच विविध नियतकालिकांत १८ शोधनिबंध प्रकाशित, २०१८-२०१९ राष्ट्रीय पातळीवर ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त. विविध सामाजिक क्षेत्रात सहभाग, एरंडेश्वर (ता. पूर्णा, जि. परभणी) येथील ओंकारेश्वर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष, परभणी जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य, औरंगाबाद येथील मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे सभासद, भारतीय ग्रंथालय संघाचे आजीव सदस्य.

•••

आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...

- amazon.com
- Kopykitab.com
- Bookganga.com
- atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

ISBN 978-93-90288-18-1
₹ - 225/-

IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kai. Rasika Mahavidyalaya
Deoni
Tq. Deoni Dist. Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur